**<u>नि.दि.दा.क्र. ३३५/२०११</u>**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**<u>नि.क्र.१२१.</u>**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.५**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | नवनाथ केशव गवईकर |
| वय | – | ५२ वर्षे, |
| व्यवसाय | – | लिपीक, तहसिल कार्यालय, कर्जत |
| राहणार | – | पेडगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर. |

**<u>वादीतर्फे सरतपास विधिज्ञ श्री.ए. एस. पुंडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

मी तहसिल कार्यालय, कर्जत येथे निवडणुक शाखेमध्ये २.५ वर्षापासुन लिपीक म्हणुन कार्यरत आहे. न्यायालयाच्या समन्स प्रमाणे मतदार यादीची प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. आता मला नि.क्र.११८ यादीमधील दस्त दाखवला. पाहुन सांगतो की, सदर दस्तावर तहसिल कार्यालयाचा शिक्का व नायब तहसिलदार यांची सही आहे, ती सही मी ओळखतो. सन २०२४ ची ती मतदार यादी आहे. मतदार यादीत अ.क्र. २५५ ला राणी विठ्ठल लबडे, अ.क्र.२५६ ला राजाराम श्रीधर लबडे, अ.क्र.२५७ विठ्ठल राजाराम लबडे यांचे नावाची नोंद आहे. त्या तिघांच्या नोंदीच्या पुढे अ.क्र.२५५ ला घरक्रमांक ३६ A, अ.क्र.२५६ ला घरक्रमांक ३६अ व अ.क्र. २५७ ला घरक्रमांक ३६अ अशी नोंद त्यामध्ये आहे. मुळ मतदार यादीप्रमाणे अभिलेखावर दाखल केलेली प्रत खरी व बरोबर आहे. सदरच्या मतदार यादीच्या प्रतीस **<u>नि.क्र.१२२</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

२. हे खरे आहे की, मतदार यादी तयार करण्यासाठी सर्व्हे तयार करावा लागतो. तो सर्व्हे बी.एल.ओ. यांनी तयार केला होता. हे खरे आहे की, गावात व्यक्ती

राहत नसेल तर त्याचे नाव मतदार यादीत येत नाही. मैनाबाई राजाराम लबडे या व्यक्तीची नोंद सदर यादीत नाही. हे खरे नाही की, अभिलेखावरील मतदार यादी कोणी व कशी तयार केली हे मला माहिती नाही. टाकळी खंडेश्वरी गावात घर क्रमांक ३६ ची किती घरे आहेत हे मी सांगु शकत नाही. मतदार यादी नि.क्र.१२२ पाहुन सांगतो की, टाकळी खंडेश्वरी गावात अलका बंडु सकट हिच्या घराचा नंबर ३६ अ आहे. हे खरे नाही की, राणी विठ्ठल लबडे, राजाराम श्रीधर लबडे, विठ्ठल राजाराम लबडे यांचे घर नंबर ३६ अ असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. नि.क्र.१२२ वरील प्रत मी फोटोप्रत काढुन आणलेली आहे. मुळ मतदार यादी मी माझ्यासोबत आणलेली नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ यांच्यामार्फत –**

**प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ पुकारले असता गैरहजर. करिता त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.12 16:46:21 +0530

(आर. बी. राऊत)

दि.१२/३/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर